क्रमांक : १५९८६/ह-२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२६

# :: परिपत्रक ::

**विषय :- मा.सदस्यांना देण्यात आलेल्या राज्यांतर्गत/राज्याबाहेरील रेल्वे कुपन पुस्तकांचा हिशेब सादर करण्याबाबत तसेच दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२६ रोजी विधीग्राह्यता संपणाऱ्या रेल्वे कुपन पुस्तिका जमा करणेबाबत..**

विधानमंडळाच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ मधील नियम ३ (अ) व ३ (ब) नुसार राज्यांतर्गत व राज्याबाहेरील प्रवासासाठी मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना विधीमंडळ सचिवालयाकडून रेल्वे कुपन पुस्तके पुरविली जातात.

या सचिवालयाकडून छापण्यात आलेल्या काही रेल्वे कुपन पुस्तकांचा विधीग्राह्यता कालावधी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२६ रोजी संपुष्टात येत आहे. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ च्या नियम १९ अन्वये विधीग्राह्यता कालावधी संपुष्टात आलेली रेल्वे कुपन पुस्तके एक महिन्याच्या आत रेल्वेकडे जमा केल्यास त्यावर रेल्वेकडून परतावा अनुज्ञेय आहे.

सबब, **दिनांक ३१ ऑक्टोबर**, **२०२६** रोजी विधीग्राह्यता कालावधी संपुष्टात येत असलेली रेल्वे कुपन पुस्तके आपणाकडे शिल्लक असल्यास ती जास्तीत जास्त **दिनांक १० नोव्हेंबर**, **२०२६** रोजीपर्यंत या सचिवालयात जमा करावी. त्यानंतर प्राप्त होणारी रेल्वे कुपन पुस्तके स्वीकारली जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

(सुषमा पाठक)
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य.**

D:\C-drive backup\d-1\2026\railwaycoupon pending note and paripatrak\paripatrak.docx